Vol 6 Issue 1 July 2016

ISSN No :2231-5063

# International Multidisciplinary Research Journal

# Golden Research Thoughts

Chief Editor
Dr.Tukaram Narayan Shinde

Publisher
Mrs.Laxmi Ashok Yakkaldevi

Associate Editor
Dr.Rajani Dalvi

Honorary
Mr.Ashok Yakkaldevi

**Welcome to GRT**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2231-5063**

Golden Research Thoughts Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial board.Readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

## Regional Editor

Manichander Thammishetty
Ph.d Research Scholar, Faculty of Education IASE, Osmania University, Hyderabad

## *International Advisory Board*

Kamani Perera
Regional Center For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus PopPhD, Partium Christian University, Oradea,Romania

Mohammad Hailat
Dept. of Mathematical Sciences, University of South Carolina Aiken

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences Al. I. Cuza University, Iasi

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Dept of Chemistry, Lahore University of Management Sciences[PK]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

......More

## *Editorial Board*

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University,Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University,Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary,Play India Play,Meerut(U.P.)

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh,
Vikram University, Ujjain

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU,Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra
Maulana Azad National Urdu University

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.aygrt.isrj.org**

ISSN: 2231-5063 Impact Factor : 4.6052(UIF) Volume - 6 | Issue - 1 | July - 2016

Golden Research Thoughts
International Recognition Multidisciplinary Research Journal
RNI : MAHMUL/2011/38887
ISSN No: 2231-5063
Impact Factor 2.2052 (UIF) [Yr. 2014]
3.4052 (UIF) [Yr. 2015]
4.6052 (UIF) [Yr. 2016]

GRT Golden Research Thoughts

# मराठी ग्रामीण कादंबरीतील बदलते जीवन

प्रा. सुलोचना बापूराव नरुटे
मु. वाघमोडेवाडी पो. गोंदवले बुद्रुक , ता. माण जि. सातारा.

**प्रस्तावना—**

ग्रामीण साहित्याची परंपरा तशी पूर्वीपासून आहे. मराठी कादंबरीमध्ये ग्रामीण जीवनाचे चित्रण आलेले आहे. परंतु त्यापाठीमागे वेगवेगळे हेतू असल्याचे दिसून येते. ना. वि. कुलकर्णी, श्री. म. माटे, शंकर पाटील, व्यंकटेश माडगूळकर, उद्ध्व शेळके यांनी ग्रामीण जीवनाचे वास्तव चित्रण केले आहे. 1960 मध्ये शिक्षणाचा प्रसार झाला. त्यामुळे तरुणांना आत्मभान आले. आत्मा विष्कारातून अस्सल स्वरूपाच्या साहित्याची निर्मिती होऊ लागली. त्यातूनच




मराठी साहित्यात अनेक साहित्य प्रवाह उदयास आले. दलित साहित्य, ग्रामीण साहित्य, स्त्रीवादी साहित्य आणि आदिवासी साहित्य असे प्रवाह निर्माण झाले. 1970च्या दरम्यान ग्रामीण साहित्याची चळवळ उदयास आली. या चळवळीमुळे सुशिक्षित झालेल्या ग्रामीण तरुणांना दिशा मिळाली. यातून अनेक नवोदित लेखक ग्रामीण जीवनाचे लेखन करू लागले.

ग्रामीण जीवनातील ज्वलंत असणारे प्रश्न आणि समस्या यांचे साहित्य रूपाने लेखन होऊ लागले. कादंबरी हा वाङ्मय प्रकार पुरेसा, विस्तृत अवकाश आणि व्यापक असणारा वाङ्मय प्रकार आहे. त्यामुळे ग्रामीण कादंबरीची विपुल प्रमाणात निर्मिती होऊ लागली. ही निर्मिती संख्यात्मकच नव्हे तर गुणात्मकतेच्या दृष्टीने विचार केला तर दर्जेदार आहे. ही कादंबरी आशयलक्षी आहे. नवोदित लेखकांनी ग्रामीण जीवनावर लिहिलेल्या काही कादंबऱ्यांच्या आधारे बदलत्या समाजजीवनाचे चित्रण कसे आले आहे? याचा शोध घेतला आहे.

### शिक्षण प्रसाराने ग्रामीण जीवनामध्ये होणारे बदल

शिक्षणाचा प्रसार तळागाळापर्यंत पोहचल्यामुळे प्रत्येकाला आत्मभान आणि स्वत्वाची जाणीव होऊ लागली. आपले शोषण होत असल्याची जाणीव होऊ लागली. त्यावर विचार मांडला जाऊ लागला. याचा प्रत्यय 1975 नंतरच्या मराठी ग्रामीण कादंबरीत येतो. 'बारोमास' आणि रिक्त—अतिरिक्त, यामध्ये येतो. बारोमासमध्ये सुशिक्षित असलेल्या नोकरी नसलेल्या तरुणांची वैफल्यग्रस्त, उद्ध्वस्त जीवनाची काहाणी चित्रित केली आहे. शेती ही किफायतशीर नाही. शिक्षण घेतलेला तरुण नोकरी मिळविण्यासाठी शेती विकण्याचा विचार करतो. तो शेतीत कष्ट करणे हलक्या दर्जाचे मानतो. हा शिक्षणामुळे बदल झाल्याचे प्रत्ययाला येते. परंतु नोकरी नसल्यामुळे एकनाथचा संसार उद्ध्वस्त होतो. मधूला नोकरी नसल्यामुळे त्याचे लग्न ठरत नाही. हा बदल अधोगती करणारा आहे. पण समाजाचा हा दृष्टिकोन योग्य नाही. शेतकरी हा एकेकाळी 'बळीराजा' होता. त्याच्याकडे हीनकस दृष्टीने पाहून 'नरकवास' म्हणून पाहिले जाते. ही किती दुर्दैवाची गोष्ट आहे. विचार करायला लावणारी आहे. शेती ही दुय्यम दर्जाची मानली जाऊ लागली आहे. अशा अनेक बदलांचे आणि समस्यांचे चित्र ग्रामीण कादंबरीतून प्रकट होताना दिसते.

### कृषिविषयक बदल

साधरणपणे स्वातंत्र्याच्या चवथ्या दशकामध्ये जागतिकीकरणाला प्रारंभ झाला याचा परिणाम व्यापारी वर्गापेक्षा शेतकऱ्यांवर अधिक प्रमाणात झाला. परदेशी कंपन्या आल्या. त्यांनी जमिनींला अवास्तव किंमत दिली. शेती पावसावर अवलंबून असल्यामुळे काही लोक डोंगराची नापीक जमीन देण्यास तयार झाले. पण त्यामुळे प्रदूषण वाढले. त्याचा इतर शेतकऱ्यांच्या शेतीवर परिणाम होऊन जमिनी नापीक झाल्या. क्षारयुक्त जमिनीत पिके न आल्यामुळे शेतकऱ्याचे जीवन उद्ध्वस्त होऊ लागले. धरण प्रकल्प आले. परंतु त्याची अमंलबजावणी योग्य पध्दतीने केली गेली नाही. त्यामुळे धरणग्रस्तांची होरपळ होऊन त्यांना जीवनाची झाडाझडती द्यावी लागली. शासनाने शेतकऱ्याचे जीवन सुधारावे म्हणून शेतीविषयक नव्या योजना राबविल्या. पाटबंधारे, रासायनिक खते, औषधे संकरीत वाण, नव्या कर्ज योजना, अत्याधुनिक शेती अवजारे, आली. मोट नाडा जाऊन विहिरीवर इंजिन, विजेवर चालणारी मोटार, बैलांऐवजी ट्रॅक्टर आले. खळ्याऐवजी मळणी यंत्रे आली. त्याचबरोबर विद्युत भारनियमन आले. पाणी असूनही विजे अभावी पिके हातची जातात. नवा वाण आला तरी त्यातही भेसळ. त्यामुळे तो उगवला नाही तर त्याचा अधिक फटका शेतकऱ्याला बसला. त्यामुळे तो तोट्यात येऊन कर्जबाजारी होतो. भांडवलदारी व्यापारी यांचे भरपूर पीक वाढले. त्यामुळे मजूरांवर कुऱ्हाड कोसळली. यातून शेतकरी सुधारण्याऐवजी आळशी बनला. त्याच्या जीवनाला ओहोटीच लागल्याचे चित्र दिसते. 'बारोमास'मध्ये देशी वाणाचा हट्ट धरणारा नानु आजोबा उपासपोटी जातो. सुभानराव संकरीत आणि जास्त उत्पादन देणारे संशोधित बी—बियाणे पेरून कर्जबाजारी होतात. याचे चित्रण 'बारोमास'मध्ये येते.

### सहकार धोरणातून बदलते ग्रामीण जीवन

आता ग्रामीण परिसरात अनेक बाबतीत बदल झालेले दिसतात. पूर्वीच्या काळी सावकारांना महत्त्व होते. त्याऐवजी खेड्यात सहकारी बॅंका, पतसंसस्थांचे जाळे पसरलेले दिसते. परंतु यामुळे शेतकरी अधिकच कर्जबाजारी होत चालल्याचे वासुदेव मुलाटे यांच्या 'विषवृक्षाच्या मुळ्या'या कादंबरीत अतिशय वास्तव चित्र उभे केले आहे.यामध्ये सहकार धोरणाची अमंलबजावणी होत असताना असंख्य शेतकरी आणि सामान्य लोक शोषणाच्या आणि भ्रष्टाचाराच्या विळख्यात अडकलेल्या दुःखभोगी वेदना, समस्या यांचे वास्तव चित्र उभे केले आहे. सहकारी संस्थांमुळे ग्रामीण माणसाचे जीवन ढवळून कसे निघते? यामध्ये राजकरणी लोकांचा दबाव, पदाधिकारी, हे सामान्य लोक आणि शेतकरी यांचे शोषण कसे करतात? यातून बदलते ग्रामीण जीवन अधोरेखित केले आहे. विश्वास पाटील यांची झाडाझडती आणि रा. रं. बोराडे यांची रिक्त अतिरिक्त या कादंबऱ्यातून सहकार क्षेत्रातील विविध समस्या आणि प्रश्नांचे चित्रण आलेले आहे. माणसाची लालसा, स्वार्थीवृत्ती माणसाला कोणते जीवन जगायला भाग पाडेल हे सांगता येत नाही. त्यासाठी येणाऱ्या समस्यांना, अन्यायला, कठीण प्रश्नांना, प्रसंगाला सामोरे गेलेच पाहिजे हे कटू सत्य आहे. हेच आजचे ऐरणीवरचे प्रश्न आहेत.

### जागतिकीकरणातून कृषिविषयक बदल

जागतिकीकरणाचा ग्रामीण जीवनावर होणारा परिणाम शंकर सखाराम यांच्या 'सेझ' व प्रवीण बांदेकर यांच्या 'चाळेगत' या कादंबऱ्यात येतो. सदानंद देशमुख यांच्या 'बारोमास'मध्ये एकंदर या जागतिकीकरणाच्या जमान्यात शेतकऱ्याचा वाली कोणीच नाही हे दाखवून देण्याचा प्रयत्न केला आहे. 'सेझ' ही शंकर सखाराम यांची 2007 मध्ये प्रसिध्द झालेली कादंबरी. यामध्ये भांडवलदारांनी आणि शासनाने रायगड जिल्ह्यातील अलिबाग तालुक्यातील खेड्यापाड्यात 'आर्थिक क्षेत्र' अर्थात 'सेझ' प्रकल्प सुरू केला. या प्रकल्पाने उद्ध्वस्त होणाऱ्या ग्रामसंस्कृतीची कहाणी आलेली आहे. यामध्ये या परिसराचा भूतकाळ आणि उद्ध्वस्त होत असलेला वर्तमान आणि देशोधडीला लागणारे भविष्याचे चित्रण अतिशय वास्तवपणे उभे केले आहे. सेझ ग्रस्त भागातील प्रादेशिकता, तिथला निसर्ग, ग्रामसंस्कृती, कृषिसंस्कृती किती महत्त्वपूर्ण आणि सधन आहे, लोकजीवन, राहणीमान, सण, उत्सव, यांनी समृध्द असलेली संस्कृती पिढ्यानपिढ्या एकमेकांशी समरस झालेली, छोटेमोठे शेतकी व्यवसाय, पोल्ट्री, दूधदुभते, भाजीपाला, गाई म्हशी, शेळ्या, मेंढ्या अशा विविध घटकाने समृध्द असलेली ही ग्राम संस्कृती आहे. इथे सेझच्या नावाखाली संपूर्ण संस्कृती उद्ध्वस्त होणार या वास्तवातून कादंबरीची सुरवात होते. यातून याला जबाबदार कोण या प्रश्नाला व प्रकल्प ग्रस्तांच्या प्रश्नाला वाचा फोडली आहे.

लोकशाही व्यवस्थेत सर्वसामान्य लोकांच्या हिताच्या, कल्याणाच्या योजना असल्या पाहिजेत हे शासनाचे गृहिततत्त्व आहे. परंतु अमंलबजावणी करताना कोणावर अन्याय होऊ नये, विशेषतः दुर्बल घटक भरडला, चिरडला जाणार नाही याचा विचार करायला हवा. या कादंबरीकाराने नव्या आर्थिक धोरणाला विरोध केला नाही. तर शासनाच्या कार्यपध्दतीला, अमंलबजावणीला विरोध केला आहे. अन्यायीवृत्तीला विरोध केला आहे. सेझसाठी शासनाने सुपीक जमिनीऐवजी नापीक, खडकाळ जमिनीचे अधिग्रहण करावे असे सूचित केले आहे.

'सेझ' ग्रस्त लोक आंदोलन करतात. परंतु भांडवलदार, शासकीय अधिकारी, राजकीय मंडळी, दलाल, यांना पिडित ग्रस्तांविषयी बिलकुल चिंता नाही. प्रत्येकजन आपली पोळी भाजण्याचा प्रयत्न करतो. अशाच चिंताग्रस्त अवस्थेत आंदोलनकार शेतकऱ्यांना उच्च पदस्थ मोर्चा यशस्वी झाल्याचे संदेश देतात. सरकार मध्यस्थी करते आणि शेतकऱ्यांना त्यांच्या सुपीक जमिनी विकत घेणार नाही असे आश्वासन देते. गावकऱ्यांना थोडासा दिलासा मिळतो. पण प्रत्यक्षात वस्तुस्थिती वेगळी असते. गावकऱ्यांना कोणतीही पूर्व सूचना न देता, त्यांना अंधारात ठेवून खाजगी कंपनीला म्हणजेच अलायनला जमिनी अधिग्रहित करण्याची परवानगी दिली जाते. त्यामुळे ग्रामस्थ अलायनची माणसं, कलेक्टर, पोलीस यांच्यावर दगडांचा वर्षाव करतात. चंदू आक्रमक होऊन पेट्रोलचा बॉम्ब फेकतो. पेटता बॉम्ब कलेक्टरच्या छताडावर बसतो. लोक बेभान होऊन अलायनला सळो की पळो करून सोडतात. इथे कादंबरीचा शेवट होतो. कादंबरीचा शेवट माणसाला जीवे मारला असा केला आहे हा गुन्हा आहे हे मान्य आहे. पण काहीवेळा न्यायासाठी गुन्हाही करावा लागतो. महाभारतातील अर्जुनानेही कर्ण, द्रोणाचार्य, आप्तस्वकीयांना युध्दात मारले होतेच ना. इथे न्यायासाठी केलेला संघर्ष योग्य आहे. कदाचित अशा प्रकारामुळे, दहशतीमुळे भ्रष्ट आणि भ्रष्टाचार नष्ट होऊ शकेल. या कादंबरीला वास्तव समस्येतून समाजात जाणीव जागृतीच्या दृष्टीने या कादंबरीला अनन्य साधारण महत्त्व आहे. यामध्ये ग्रामीण जीवनातील बदलते वास्तव अधोरेखित होते

'विशेष आर्थिक धोरण' या नावाखाली पिकाऊ असलेल्या जमिनी भांडवलदार, परदेशी कंपन्या यांना पाठिंबा देणारे अन्याय्य

सरकार. त्यामुळे ग्रामीण परिसरातील खेडी, परंपरेने चालत आलेली संस्कृती, कृषिसंस्कृती उद्ध्वस्त होऊन रस्त्यावर येत आहे. याचे अत्यंत सर्जनशील आणि संवेदनशीलवृत्तीने चित्रण केले आहे.

'चाळेगत' ही प्रवीण बांदेकर यांची 2009मध्ये प्रसिध्द झालेली कादंबरी. ही कादंबरी जागतिकीकरणावर प्रकाश टाकते. हाच कादंबरीचा आशय आणि विषय आहे. यामध्ये कोकणातील लोकांच्या जमिनी पर्यटनाच्या नावाखाली, रोजगार निर्मिती उपलब्ध होतील असे म्हणून घेतल्या. कित्येक लोकांनी पर्यटन प्रकल्पाला, परदेशी कंपन्यांना विरोध केला. शासनाने मात्र त्यांना या जगातून घालवून दिले. कोकणातील अनेक गावे या प्रकल्पात बळी पडतात. मच्छीमार लोकांचे जीवन सर्वस्वी मच्छीमारीवर अवलंबून आहे. पण प्रकल्पामुळे येथील व्यवसाय पूर्णपणे धोक्यात येणार होते. यासाठी मच्छीमाराचे नेते सुरेश धुरी सांगतात ''शासनाच्या भांडवलशाही धार्जिण्या वृत्तीमुळे भविष्यात यापुढे अशा प्रकारचे प्रसंग केवळ किनारपट्टीवरील मच्छीमार बांधवांवर नव्हे, तर तमाम भूधारक शेतकऱ्यांवरही येऊ शकतात''1एकंदरीत जागतिकरणामुळे महाराष्ट्रीयन माणूस भूमीहीन आणि बेघर होऊ लागला. या बदलाचे चित्र चाळेगतमध्ये अतिशय गंभीरपणे टिपलेले आहे. 'चाळेगत' म्हणजे कोकण वासियांचा टाहो आहे.

## *निष्कर्ष*

1975 नंतरच्या प्रकाशित झालेल्या काही कादंबऱ्यांचे अवलोकन, निरीक्षण केले तर ग्रामीण संस्कृती आजच्या बदलत्या नव्या सांस्कृतिक वातावरणात गुदमरताना दिसते. जीवघेणा संघर्ष करावा लागतो. पूर्वीचे उत्तम शेती मध्यम व्यापार आणि कनिष्ठ नोकरी हे समीकरण होते. आता उत्तम नोकरी मध्यम व्यापार आणि कनिष्ठ शेती असे बदलते चित्र दिसते. मात्र परदेशी भांडवलदार आणि व्यापारी यांच्या बाबतीत वेगळे आहे. आपल्या देशात शेतीप्रधान अर्थकारण असण्याऐवजी उद्योगनिष्ठ भांडवलदार अर्थव्यवस्थेमुळे कृषिसंस्कृतीला अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे. संघर्ष करावा लागत आहे. याचे चित्र काही मराठी ग्रामीण कादंबऱ्यांतून स्पष्ट होते. हे वास्तव इतके भीषण आणि विचार करायला लावणारे आहे. 'सेझ' 'चाळेगत' या कादंबऱ्यातून शेतकऱ्यांचे फक्त शोषणच नव्हे तर त्यांना कायमचे नष्ट करण्याचे कारस्थान आमंलात येत असल्याचे दिसते. यामध्ये शासन, भांडवलदार, व्यापारी आणि जागतिक स्तरावरील काही बहुराष्ट्रीय कंपन्या यांचा समावेश आहे.

1975 नंतरची मराठी ग्रामीण कादंबरी अत्यंत संवेदनशील जाणिवेने अभिव्यक्त होताना दिसते. समाजातील समस्या, प्रश्न आणि त्यातून बदलत्या समाजाचा वेध घेताना दिसते. ग्रामीण वास्तवाच्या अगतिक झालेल्या तरुण पिढीची दिशाहीनता, शहरीकरणाच्या संपर्कामुळे निर्माण झालेला वाढता चंगळवाद, जागतिकीकरणाचे शेतीवर झालेले दुष्परिणाम, बेभरवशाच्या पावसामुळे आणि शेतीमुळे सतत भेडसावणारी उद्याची चिंता, कर्जबाजारीपणामुळे गांजलेल्या, हतबल झालेल्या शेतकऱ्यांना कराव्या लागत असलेल्या आत्महत्या, सरकारी उदासीनता, त्यातही शिकलेले संधीसाधू राजकारण आणि भ्रष्ट्राचार अशा किती तरी विषयांचे आकलन करून देणारी कादंबरी जागतिकीकरणाच्या काळात ग्रामीण मनाचे आक्रंदन सशक्तपणे मांडण्याची दृष्टी आजच्या लेखकात दिसते. शेतकऱ्यांचे होणारे शोषण, एकंदरीत ग्रामीण शेतकरी तरला तरच भारत तरेल. देश शाबूत ठेवायचा असेल तर बळीराजा जागवला व जगवला पाहिजे असा संदेश सदानंद देशमुख एकनाथच्या व्यक्तिरेखेतून सूचित करतात.

## *संदर्भ–*

1 बांदेकर प्रवीण–चाळेगत शब्दालय प्रकाशन, प्र. आ. 2009 पृ. 232
2 झाडाझडती–विश्वास पाटील, राजहसं प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती 1991, अठरावी आ. 2012,
3 बारोमास–सदानंद देशमुख, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, सातवी आ. 2007,
4 सेझ–शंकर सखाराम, 2007
5 चाळेगत– बांदेकर प्रवीण, शब्दालय प्रकाशन श्रीरामपूर, प्रथमावृत्ती ऑक्टों. 2009



*प्रा. सुलोचना बापूराव नरुटे*
*मु. वाघमोडेवाडी पो. गोंदवले बुद्रुक , ता. माण जि. सातारा.*

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Book Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- ✶ International Scientific Journal Consortium
- ✶ OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- EBSCO
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database
- Directory Of Research Journal Indexing

Golden Research Thoughts
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.aygrt.isrj.org